# ऋणनिर्देश

'मराठी नाट्यसंगीताचे नाटकातील आणि मैफलीतील प्रयोजन, स्वरूप, व्याप्ती या संदर्भाच्या अनुषंगाने तुलनात्मक विश्लेषण' या विषयावरील प्रबंध सादर करताना मला मनापासून आनंद होत आहे. या विषयावर संशोधन करत असताना एक मोठे आव्हान समोर उभे राहिले. त्यातून सहजतेने पार पडण्यासाठी अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले.

ईश्वरी कृपा आणि माझे श्रद्धास्थान असलेल्या गुरुवर्य मा. जयमाला शिलेदार यांच्या शुभाशीर्वादाने मी हे कार्य संपन्न करू शकले. ते मी त्यांच्या चरणी मन:पूर्वक अर्पण करत आहे.

माझे आदरणीय सासू-सासरे मा. सौ. कीर्तीदेवी आणि मा. डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर तसेच माझे आई-वडिल मा. सौ. अलका आणि मा. श्री. शाम कुलकर्णी यांची अतीव इच्छा होती की संगीतक्षेत्रातील सर्वोच्च पदवी मी मिळवावी. या क्षेत्रात सरस काम मी करावे. माझ्या या संशोधनात त्यांची प्रेरणा, पाठबळ, प्रत्यक्ष मदत यामुळे हा प्रबंध मी सहजतेने पूर्ण करू शकले. माझे बंधुद्वय धनंजय व यशोधन कुलकर्णी आणि खरवंडीकर कुटुंबीय यांचाही सहभाग अत्यंत मोलाचा ठरला.

घर, संसार आणि सांगीतिक वाटचाल हे सर्व सांभाळताना माझे पती प्रा. श्री. मकरंद खरवंडीकर यांचे सक्रिय व अमूल्य सहकार्य वेळोवेळी संशोधनकार्यात मिळाले. विषयाचे गांभीर्य व आकलनक्षमता नसतानासुद्धा माझी कन्या कु. दिप्ती हिने लहान वयात दाखविलेली जाण विशेष उल्लेखनीय आहे. तसेच वेळोवेळी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या मिळालेले तिचे सहकार्य प्रबंधपूर्ततेस बळ देणारे ठरले.

एस्. एन्. डी. टी महिला विद्यापीठ, पुणे येथील पदव्युत्तर संगीतविभाग प्रमुख मा. प्रा. डॉ. शीतल मोरे यांच्या आश्वासक सहकार्यामुळे मला निश्चिंतपणे योग्य दिशेने वाटचाल

करता आली. प्रबंधविषयाबद्दल त्यांनी सहृदयतेने आपुलकी दर्शविली. त्यांच्या या प्रोत्साहनामुळे त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यापेक्षा खरेतर त्यांच्या ऋणातच राहणे मला जास्त आवडेल. पदव्युत्तर संगीतविभागात कार्यरत असलेले सर्व शिक्षक यांचेही सहकार्य लाभले. संगीत क्षेत्रातील मान्यवर कलावंत डॉ. सुधा पटवर्धन यांचेही बहुमोल सहकार्य मिळाले. प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी नाट्यसंगीतक्षेत्रातील मान्यवर कलावंतांनी दिलेल्या मुलाखती साहाय्यकारी ठरल्या. त्यामुळे या सर्व मान्यवर कलावंतांची मी ऋणी आहे. ज्येष्ठ तबलावादक पं. विनायकराव थोरात व ऑर्गनवादक मा. डॉ. म. ना. बोपर्डीकर यांचे शुभाशीर्वाद व सहकार्य लाभले.

कोणत्याही कलेची साधना करताना त्या कलेवर नितांत श्रद्धा ठेवून प्रामाणिकपणे सातत्याने साधना करत राहणारा खरा कलावंत आणि त्या कलेचे मर्म समजून घेण्यासाठी कलाकाराने आपले आयुष्य खर्ची घातले पाहिजे. सतत रियाजात, साधनेत राहिले पाहिजे", असे मौलिक विचार मला ज्यांच्याकडून मिळाले ते कै. पं. नीळकंठबुवा अभ्यंकर यांचे ऋण मानावे तितके थोडेच आहेत.

अभ्यंकरबुवा आणि नाट्यसंगीत क्षेत्रातील प्रसिद्ध मान्यवर गायिका आणि प्रस्तुत प्रबंधाच्या मार्गदर्शिका मा. कीर्ति शिलेदार यांच्याकडून थोडक्या सहवासात शास्त्रीय व नाट्यसंगीताबद्दलची ओढ, त्याच्यासाठी करावी लागणारी मेहनत, समजून-उमजून गाणे म्हणजे काय या आणि अशाच खूप चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. हाच ठेवा माझ्या सांगीतिक वाटचालीला प्रेरणादायी ठरत आहे. कीर्ति शिलेदार यांनी वेळोवेळी दिलेल्या अचूक व नेमक्या मार्गदर्शनामुळे संशोधनकार्यास पूर्णत्व आले. अत्यंत जबाबदारीने, सजगपणे, नेमकेपणाने माझ्याकडून हे संशोधन नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी मा. दीप्ती भोगले यांचेही तितकेच मार्गदर्शन मिळाले. अहमदनगर-पुणे यामधील भौगोलिक अंतर कामाच्या आड न येता शिस्तबद्धरितीने संशोधनाचा नियोजित टप्पा वेळीच पूर्ण

करणे यांच्यामुळेच शक्य झाले.

बुकमार्क पब्लिकेशन्सचे सौ. वर्षा आणि श्री. पराग पिंपळे आणि सहकारी, टंकलेखन आणि मांडणी करणाऱ्या अपर्णा राजवाडे या सर्वांच्या मौलिक सहकार्यामुळेच मला हा प्रबंध वेळेवर सादर करणे शक्य झाले.

याशिवाय माझ्या असंख्य हितचिंतक सुहृदांनी दिलेल्या मन:पूर्वक शुभेच्छांमुळे माझा मार्ग सुकर झाला. मला प्रोत्साहन मिळाले.

या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

•••